


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २७७ वा सोमवार दि. ०६ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# तलाठ्यांच्या खासगी कार्यालय व सहायकांवर येणार आता टाच...

## वरिष्ठ स्तरावरून तलाठ्यांचे गैरप्रकार रोखण्यासाठी उपाय

जनसंचलन/बुलढाणा

महसूल विभागात काम करीत असताना तलाठी हे बऱ्याच ठिकाणी खासगी जागेत असलेल्या कार्यालयांचा तसेच कामकाज करताना खासगी सहायकांचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आता वरिष्ठस्तरावरून यासंदर्भात निर्देश जारी करण्यात आले आहेत. यावरून काही भ्रष्टाचारी तलाठ्यांद्वारे करण्यात येणारे गैरव्यवहार व भ्रष्टाचाराला चाप बसणार आहे.यासंदर्भातील महसूल व वन विभाग मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी श्रीकांत मोहिते यांनी जारी केलेले एक पत्र हॅलो बुलडाणा,दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजला प्राप्त झालेले आहे. पत्रात श्री. मोहिते यांनी म्हटले आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला मागील काही काळात प्राप्त झालेल्या लाचेच्या तक्रारींनंतर विभागाकडून अनेक ठिकाणी कारवाया करण्यात आल्या. या कारवायांमध्ये हे स्पष्टपणे आढळून आले की, तलाठी हे सरकारी जागेत असलेल्या कार्यालयांऐवजी खासगी जागेत थाटलेल्या कार्यालयांचा वापर करतात. याशिवाय बऱ्याच ठिकाणी तलाठी हे खासगी सहायक ठेवतात व त्यांच्या माध्यमातून शासकीय कामकाज तसेच काही वेळेस भ्रष्टाचारासाठी बेकायदेशीर आर्थिक देवाणघेवाणी करतात. आजवर ज्या तलाठ्यांना लाचप्रकरणी पकडण्यात आलेले आहे, त्यात बऱ्याच ठिकाणी हे प्रकार आढळून आले आहेत.यासंदर्भातील एक अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर महासंचालकांकडून एक अहवाल शासनाला देण्यात आला होता. त्या अहवालानुसार या पत्रात संबंधित निर्देश जारी करण्यात आलेले आहेत.पत्रात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार ग्राम महसूल अधिकारी म्हणजे तलाठी यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत. ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी कामकाज करताना शासनाने नेमून दिलेल्या आदेशांचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. हे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा




(वर्तणूक) नियम १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यास बंधनकारक आहे व त्यानुसार कर्तव्यपालन करावे लागते. परंतु काही प्रकरणात अशाप्रकारे नियमांचा भंग आढळून आल्यामुळे यासंदर्भात हे निर्देश जारी करण्यात आलेले आहेत.तलाठ्यांनी शासकीय कामकाज केवळ आणि केवळ शासकीय जागेत किंवा शासनाद्वारे मान्यताप्राप्त भाड्याच्या जागेतूनच शासकीय कामकाज करावे. इतर कुठल्याही खासगी इमारतीतून कामकाज करू नये. तसेच ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी शासकीय कामकाज करताना खासगी व्यक्ती किंवा खासगी मदतनिसाचा वापर करू नये, असेही स्पष्ट निर्देश या पत्रातून जारी करण्यात आलेले आहेत. तलाठ्यांनी कोणतेही शासकीय दस्तऐवज हे खासगी इमारतीत ठेवू नये, असेही या पत्रात म्हटले आहे.

## टेकाळेंसारख्या भ्रष्टाचारी महाठगांना शासन आवर घालणार का?

महसूल विभागात कामकाज करताना खरे तर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोर नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. परंतु बुलढाणा महसूल विभागाच्या इतिहासात सर्वाधिक भ्रष्ट असणारे आणि भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित करणारे महाठग तलाठी विजय दत्तात्रय टेकाळे हे तर कोणत्याच नियमांचे पालन करीत नाहीत. वरतून भ्रष्टाचाराचा त्यांनी कळस गाठलेला आहे. आपल्याच शासनाच्या महसुलाला चुना लावण्याचे काम त्यांनी केलेले आहे. भ्रष्टाचाराचे आज तलाठी टेकाळे हे शिरोमणी बनलेले आहेत. त्यांच्यावर महसूल विभागाचे नियम किंवा सेवाशर्ती लागू होत नाहीत का, असा प्रश्न आज अनेकजण उपस्थित करीत आहेत. कारण टेकाळे यांनी आजवर अनेकदा आपल्या सेवाकाळात सेवाशर्तींचा भंग केला आहे. त्यांची संपूर्ण चौकशी झाली तर त्यांनी नियमभंग, गैरप्रकार, भ्रष्टाचार याचे सर्व विक्रम मोडित काढल्याचे अधिकाऱ्यांना दिसून येईल. राज्याचा जो महसूल विभाग छोट्या-छोट्या गोष्टींसाठी तलाठ्यांना निर्देशित करतो, त्या महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना महाठग विजय टेकाळेंचे भ्रष्टाचारी प्रताप दिसत नाहीत का? टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची कीड सर्वात आधी महसूल विभागातून उखडून फेकली पाहिजे. तसेच त्यांनी आजवर भ्रष्टाचाराचा जो काही नं नाच घातलेला आहे, त्यावरही वरिष्ठांनी कारवाई करणे गरजेचे आहे. बुलढाण्याच्या महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तर आता टेकाळेंसमोर चक्क लोटांगणच घातले आहे. अधिकाऱ्यांनी लाचारीची अगदी परिसीमा गाठली आहे. या स्थितीत टेकाळेंसारखे भ्रष्टाचारी हे कमरेचे सोडून भ्रष्टाचार करताना दिसून येत आहेत. यावरही कारवाई करण्यासाठी कोणीतरी धजावण्याची गरज आहे.

# शिवारात आढळले कोरियन भाषेत लिहिलेले यंत्र: काय आहे सत्य?

जनसंचलन/मेहकर

मेहकर नजिकच्या चायगाव शिवारात ४ जानेवारीला संध्याकाळी आकाशातून एक कोरियन यंत्र पडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. श्रीकांत बदामे यांच्या शेतात हे यंत्र फुग्यासोबत खाली आले. शेतात असलेल्या श्रीकांत व त्यांचा मुलगा महेश बदामे यांनी यंत्र पडताना पाहिले. या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या यंत्रावर कोरियन भाषेत मजकूर लिहिलेला होता. महेश बदामे यांनी गुगल ट्रान्सलेटच्या मदतीने तो मजकूर वाचला असता, हे यंत्र कोरियन सरकारच्या हवामान खात्याशी संबंधित असल्याचे समोर आले. मजकूरानुसार, हे यंत्र जर कुठे सापडले, तर ते कचऱ्यासारखे फेकून द्यावे, असा संदेश देण्यात आला आहे. तथापि, यंत्र खरोखरच कोरियन हवामान खात्याचे आहे का, याबाबत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. यापूर्वी, चिखली तालुक्यातही अशाच प्रकारचे यंत्र सापडले होते, त्यामुळे ही घटना पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण करत आहे. महेश बदामे यांनी पोलिस आणि महसूल विभागाला याची माहिती दिली असून, घटनास्थळाची पाहणी झाली आहे. या घटनेमुळे कोरियन यंत्रांचा उद्देश आणि त्यांचा संबंध नेमका काय आहे, याबाबत स्थानिक नागरिकांत वेगवेगळ्या चर्चा सुरू होत्या. परिसरातील लोकांना योग्य माहिती आणि या घटनेमागील सत्य उघडकीस आणण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलण्याची गरज आहे. अशा रहस्यमय घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे सावट अधिक गडद होत आहे.



दैनिक निडर निर्भीड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# बालिकेच्या खून प्रकरणातील आरोपीने लॉजमालकाला विकला होता मोबाइल

**जनसंचलन/ शेगाव**

कल्याणमधील बालिकेवर लैंगिक अत्याचार करून हत्या केल्याप्रकरणी प्रमुख आरोपी विशाल गवळीला शेगावात पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. त्या आरोपीने शेगावातीलच एका लॉजमालकाला मोबाइल विक्री केल्याची बाब पोलिस तपासात पुढे आली आहे. आरोपी विशाल गवळीसह त्याची पत्नी साक्षी हिला शनिवारी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने १८ जानेवारीपर्यंत (१४ दिवस) न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. २३ डिसेंबर रोजी संध्याकाळी कल्याण पूर्वेतून बालिकेचे अपहरण झाले होते. अल्पवयीन मुलगी आईकडून २० रुपये घेऊन खाऊ आणण्यासाठी दुकानात गेली होती. ती परत न आल्याने कुटुंबाने मुलीचा शोध सुरू केला. मुलीच्या वडिलांनी बेपत्ता असल्याची तक्रार कोळसेवाडी पोलिस ठाण्यात केली. २४ डिसेंबर रोजी बालिकेचा मृतदेह भिवंडीनजीक बापगाव परिसरात सापडला. दरम्यान, पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली. आरोपी शेगावात असल्याची माहिती मिळाली. त्यावेळी पोलिसांनी त्याला लॉज परिसरातील एका सलूनमधून ताब्यात घेतले होते. दरम्यान, आरोपीवर संशय आल्याने पोलिसांनी आरोपीला मोबाइलबाबत विचारणा केली. त्याने कसारा घाटात फेकून दिल्याची माहिती दिली. तपासादरम्यान त्याने मोबाइल बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील एका लॉजमालकाला ५ हजार रुपयांमध्ये विकल्याची कबुली दिली. पोलिसांनी संबंधित लॉजमालकाशी संपर्क साधला, त्यावेळी मालकाने मोबाइल, सीम कार्ड पोलिसांना देण्याची तयारी दाखवली. या मोबाइलच्या माध्यमातून विशालने हत्या करताना आणखी कोणाला संपर्क केला होता काय, याचा तपास आता सुरू आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्ह्यातील दुचाकी ताब्यात घेतली आहे.

# केबीजी नॉलेज विद्यालयामध्ये विविध उपक्रम

**जनसंचलन/मोताळा**

बोराखेडी येथील केबीजी नॉलेज विद्यालयामध्ये जिजाऊ- सावित्री जन्मोत्सवानिमित्त दि. ३ ते १२ जानेवारीपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी भारतीय संविधानाची प्रतिकृती साकारून संविधानाच्या मूल तत्त्वांचा प्रचार करणारे फलक लावून मोताळा येथे रॅली काढण्यात आली. विद्यालयामध्ये दरवर्षी क्रांतिज्योती सावित्री बाई फुले, राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्ताने उत्सवाचे आयोजन केल्या जाते. दि. ३ जानेवारीला प्राचार्य डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे, बोराखडीचे सरपंच आशा राहुल तेलंग यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात केली. एकात्मतेचा संदेश देत वेगवेगळ्या पोशाखामध्ये असणारे विद्यार्थी, ढोल-ताशांच्या निनादामध्ये लेझीम पथक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. मोताळा बसस्थानकात विद्यार्थिनींनी कराटे प्रात्यक्षिक, शिवकालीन साहसी खेळ सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी संविधान पथनाट्य व लेझीम नृत्य सादर केले. प्राचार्य डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करून संविधानिक मूल्य जपण्याचे आवाहन केले. विद्यालयामध्ये १२ जानेवारीपर्यंत शैक्षणिक सहल, गीतगायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, आनंद मेळावा व आदी कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

# बुलढाण्यात आमदार सिद्धार्थ खरात यांचा जाहीर सत्कार व पदाधिकारी बैठक संपन्न.

**जनसंचलन/बुलढाणा**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मेहकर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचा जाहीर सत्काराचा कार्यक्रम व पदाधिकाऱ्यांची बैठक आज दिनांक ५जानेवारी २०२५ रोजी शेतकरी भवन कृषी उत्पन्न बाजार समिती बुलडाणा येथे संपर्क प्रमुख प्रा नरेंद्र खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, दिलीपराव वाघ, माजी जिल्हा परिषद सदस्य संजयभाऊ वडतकर,ॲड. संदीप गवई, ॲड. आकाश घोडे,वसंतराव भोजने, विधानसभा संपर्क प्रमुख राजेंद्र रावराणे, ॲड जयश्रीताई शेळके, महीला आघाडी जिल्हा प्रमुख चंदाताई बढे, जिल्हा संघटक प्रा डी एस लहाने , डॉ गोपाल बच्छिरे, जिल्हा समन्वयक संदीप दादा शेळके , युवासेना जिल्हा प्रमुख नंदु कऱ्हाडे, शुभम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मेहकर विधानसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचा बुलडाणा जिल्हा शिवसेनेतर्फे जाहीर सत्कार करण्यात आला. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाने खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने, नव्या जोशाने कामाला लागावे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहे. त्या अनुषंगाने पक्ष संघटन मजबूत करणे, सदस्य नोंदणी करणे इत्यादी विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या २३ जानेवारी रोजी होणाऱ्या जयंती निमित्त प्रत्येक पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करावी असे आवाहन मान्यवरांनी यावेळी उपस्थितांना केले.




या कार्यक्रमाला उप जिल्हा प्रमुख सुनील घाटे, बद्री बोडखे, प्रा.आशिष रहाटे, तुकाराम काळपांडे, तालुका प्रमुख लखन गाडेकर, विजय इंगळे, किसन धोंडगे, महेंद्र पाटील, दादाराव खार्डे, दिपक मापारी, गजानन वाघ, दिपक चांभारे, ईश्वर पांडव, श्रीराम खेलदार, शहर प्रमुख गजानन ठोसर, रमेश ताडे, भीमराव पाटील,, संजय वडतकर, दिलीप वाघ, वासुदेव बंडे पाटील, अशोक गव्हाणे, गजानन उबरहंडे, विजय इतवारे, गणेश पालकर, एकनाथ कोरडे, आशिष खरात, प्रा सिद्धेश्वर आंधळे, तसेच शिवसेना, युवासेना सेना, महीला आघाडी, सर्व अंगीकृत संघटनांचे जिल्हा प्रमुख , उप जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, उप तालुका प्रमुख, विभाग प्रमुख शाखा प्रमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वरूड शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात दोन बकऱ्या ठार

**जनसंचलन/मोताळा**

वरूड शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात दोन बकऱ्या ठार झाल्या तर एक बकरी जखमी झाल्याची घटना शनिवारी ४ जानेवारी रोजी सकाळी उघडकीस आली. यात शेतकऱ्याचे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले. तालुक्यातील आडविहिर येथील शेतकरी शंकर जगन्नाथ जंगले यांची आडविहिर शिवाराला लागूनच वरुड शिवारात शेती आहे. तेथे गोठ्यात त्यांचा मुलगा संतोष जंगले यांनी शुक्रवारी सायंकाळी बकऱ्या बांधल्या होत्या. ४ जानेवारी रोजी त्यांनी शेतात जाऊन पाहिले असता बिबट्याच्या हल्ल्यात दोन बकऱ्या ठार तर एक बकरी जखमी केल्याचे दिसून आले. वन विभागाला यासंदर्भात माहिती देण्यात आली. वन विभागाला याची माहीती मिळाताच वनरक्षक एल. डी. राठोड यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या घटनेमुळे आडविहिर, वरुड शिवारात बिबट्याची दहशत पसरली असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तत्काळ नुकसानभरपाई देऊन बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी करीत आहे. मोताळा तालुक्यातील गावांमध्ये अलिकडील काळात बिबट्याचा वार वाढला आहे. गेल्या दोन महिन्यात बिबट्याच्या हल्ल्यात तीन चार जण जखमी झाले आहेत. त्यामुळे येथे वन्यजीवांसोबत संघर्ष होत आहे.





# महाराष्ट्र मराठा सोयरीकने सुरू केलेल्या वधू वर परिचय मेळावा

## ३५ वा मराठा वधू वर परिचय मेळावा बुलढाण्यात संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

वधु आणि वरांना यशोचित जीवनसाथी निवडण्याच्या दृष्टिकोनातून सकल मराठा समाजाने सुरू केलेल्या वधु वर परिचय मेळाव्याला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त होत आहे असे प्रतिपादन सुनील जवंजाळ यांनी केले.. सकल मराठा समाजाच्यावतीने बुलढाणा येथील गर्दी वाचनालयाच्या सभागृहामध्ये महाराष्ट्र मराठा सोयरीक उपक्रमांतर्गत वधु वर परिचय मेळाव्याचे आयोजन ५ जानेवारीला करण्यात आलं होतं यावेळी मार्गदर्शन करताना सुनील जवंजाळ बोलत होते ते पुढे म्हणाले की आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रत्येक पालकांना आपल्या पाल्य चांगलं उच्च शिक्षीत झाला पाहीजे अशी अपेक्षा असते शिक्षण घेतांना मुलांच वय वाढत जातं अशावेळी मुलीचं लग्न करताना तिच्या शिक्षणा योग्य वर मिळणे तिला अपेक्षित असतं तर वय झाल्यामुळे वडिलाला मुलीला शोभेल असा वर शोधण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो अशा परिस्थितीत त्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातूनच २०१६ पासून आपण छोट्या प्रमाणात वधू-वर परिचय मेळाव्याच्या कार्यक्रमाला सुरुवात केली आता हा कार्यक्रम व्यापक होत चालला असून मराठा समाजातील सर्व पोटजातीचा समावेश महाराष्ट्र मराठा सोयरीक उपक्रमात करण्यात आला आहे





असेही सुनिल जवजांळ यांनी सांगितले बुलढाणा येथे ३५ वा वधु वर परिचय मेळावा संपन्न होत असल्याचे सांगत या मेळाव्याच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी ही महिलांनी घेतल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेखा सोमनाथ सावळे तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मीनल आंबेकर यांनी केलं यावेळी प्रास्तविकातून मराठा समाजा अंतर्गत येणाऱ्या सर्व पोट जातीतील घटकांना एकत्र करत मराठा समाजात एकत्र बांधण्याचा काम महाराष्ट्र मराठा सोयरीकच्या माध्यमातून केल्या जात असल्याचे सांगण्यात आले कार्यक्रमाचं सूत्रसंचालन सौ अरुणा चव्हाण संजीवनी शेळके यांनी केलं कार्यक्रमादरम्यान वधूवरांनी आपला परिचय उपस्थितांना करून दिला या वधुवर परिचय मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सुनिल रामराव शेळके,नारायणराव मिसाळ , अरविंद बापू देशमुख, दिनकरराव बावस्कर ,अशोकराव चौधरी, कडाळे साहेब,, श्री गणेशराव पांडे, श्री सागर पवार,प्राचार्य डॉ. अण्णासाहेब म्हळसणे, भगवान राव कानडजे ,श्री मंगेश मोगल, सुनील सपकाळ , डॉ. पुरुषोत्तम देवकर, लक्ष्मण ठाकरे, ,श्री सुरेश देवकर ,शिवाजीराव तायडे, श्रीकृष्ण जेऊघाले, प्रा रामदास शिंगणे , प्रा गणेश कड, म्हस्के साहेब, सुभाषराव देवकर, गजानन पाटोळे, ऍड विजय सावळे,रमेश काळे,डॉ विनोद जवरे, डॉ मधुकर देवकर, डॉ शोन चिंचोले,प्रकाश काळवाघे, डॉ विक्रम घुले,गणेशराव निकम ,कैलास राऊत, प्रभाकर पाटील काळवाघे ,रमेश बुरकुल, रमेश भोंडे, शिवाजीराव तायडे , माधवराव जपे,डॉ. सत्येंद्र भुसारी, प्रल्हादराव ताठे,नंदूभाऊ सवडतकर , पंढरी सुसर, माधवराव शेळके, भालचंद्र देशमुख, राजेश गायकवाड साहेब, विजय शिरसाट विजयसिंह राजपूत,मीनलताई आंबेकर , डॉ उषाताई खेडेकर , डॉ संजीवनी शेळके, मालिनी सवडतकर, वैशाली म्हस्के,ज्योतीताई पाटील, मालतीताई शेळके ,सुरेखाताई सावळे, तनुजा आडवे , वंदनाताई चव्हाण , चारुशिला पाटील , प्रतिभा भोंडे, प्रतिभा भुतेकर, किरण भोंडे,आशा राजे जाधव, उषा उगले, मंगलाताई पाटील यांनी परिश्रम घेतले

# मिस ऑलिंपिया पौर्णिमा सोनुने यांचा आमदार सिद्धार्थ खरात यांच्याकडून उत्साहवर्धक सत्कार!

**जनसंचलन/बुलढाणा**

मेहकर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात यांनी मिस ऑलिंपिया ठरलेल्या पौर्णिमा सोनुने यांचा मोठ्या उत्साहाने सत्कार केला. पौर्णिमा सोनुने यांना मिस ओलंपिया चा मान मिळाला असून, त्यांच्या या अद्वितीय कामगिरीवर जिल्ह्याला गर्व आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांनी पौर्णिमाच्या कष्टांची आणि जिद्दीची प्रशंसा केली आणि तिच्या यशामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात एक नवीन उंची गाठली आहे, असे सांगितले. त्यांनी शासकीय मदतीसाठी तात्काळ क्रीडा कार्यालय मुंबईचे अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि ते म्हणाले, ङ्कङ्कपौर्णिमाला जितके मदतीचे स्वरूप दिले जाऊ शकते, त्यासाठी मी तयार आहे.



यावेळी मेहकर शिवसेना शहर प्रमुख किशोर गारोळे, सिटी न्यूज दैनिक जनसंचलन व (हॅलो बुलडाणा) संपादक जितू कायस्थ, टॅटू टेम्पल चे संचालक संजय गोरले, पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे टिल्लू गोरले, ओम कायस्थ योगेश विसपुतेसह मान्यवर अन्य शिवसैनिक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पौर्णिमा सोनुने यांच्या कष्टाने आणि आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मदतीची तयारी या दोन्ही गोष्टींमुळे नागरिकांच्या मनात एक सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

# जनहिताची कामे केल्याने तीनवेळा आमदार, मंत्री झालो - सुबोध सावजी


**जनसंचलन/ डोणगाव**

सामाजिक भरोशावर अनेकजण निवडणूक लढवून जिंकतात, पण मी समाजाची भक्कम कामे व जनतेसाठी केलेली कामे, आजपर्यंत जनतेसाठी केलेली विविध आंदोलने यामुळे तीनवेळा आमदार व मंत्री झालो. आजही ८० व्या वर्षी मी तंदुरुस्त आहे व जनतेसाठी आवाज उठवत आहे, ही केवळ जनतेची माझ्याविषयी असलेली आत्मियता आहे, असे मत माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी आपल्या वाढदिवसाच्या सत्काराला उत्तर देताना ३ जानेवारीला सपना सावजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले. वाढदिवसानिमित्त सुबोध सावजी यांची फटाक्यांची आतषबाजी करत बग्गीतून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ५ क्विंटलच्या हाराने व जेसीबीने पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांचा वाढदिवस आणि सपना सावजी यांच्या २५ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष दाळू गुरूजी तसेच प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार सिद्धार्थ खरात, माजी आ. सुभाषराव ठाकरे, दिलीप कुमार सानंदा, तोताराम कायंदे, संजय रायमुलकर, विजयराज शिंदे, काँग्रेसचे शाम उमाळकर, आशिष रहाटे, साहेबराव सरदार, काँग्रेसचे लक्ष्मणराव घुमरे, नंदकिशोर बोरे, डॉ. साईश सावजी, डॉ. पूजा सावजी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक शैलेश सावजी यांनी केले.

# शेगावात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवाश्रमाच्या कामाला सुरुवात

**जनसंचलन/ शेगाव**

येथील राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवाश्रमाच्या शुक्रवारी सुरूवात झाली. कामाला संतनगरी शेगावात श्री गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक, कार्यकर्ते सद्गुरू गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातून येतात. त्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी, तसेच बुलढाणा जिल्ह्यातील गुरुदेव सेवा मंडळाचे संघटन होऊन प्रचार कार्याला गती येण्याच्या दृष्टीने संतनगरीत राष्ट्रसंतांच्या आश्रमाची निर्मिती होत आहे. यामध्ये भक्तनिवास, गौरक्षण, विद्यार्थी निवास, विद्यार्थी भोजन व्यवस्था, विद्यार्थी शिक्षण, कीर्तन, प्रवचन, भाषण, भजन, गायन, हार्मोनियम, तबला, मृदंग इत्यादीचे शिक्षण देण्यात येईल. उन्हाळी बालसंस्कार शिबिर वर्ग २ मे ते १५ मे मुलांचे, १६ मे ते २५ मे मुलींचे अशा उपक्रमातून आश्रमाचे कार्य राहणार आहे. यावेळी सुशिल महाराज वणवे, रवींद्र मुंडगावकर, ॲड. वंदन कोहाडे, नूतन कोहाडे, रामदास वणवे, जिजा वणवे, गणेश जवंजाळ, रामदास महाले, मनोहर पाचपोर, वसंतराव बोराडे, वासुदेव पाटील, निवृत्ती पाटील, राजेश जवंजाळ, अमोल लांजुळकर, मनोज लांजुळकर, विठ्ठल आखुड, रामेश्वर पाटील, अशोक चव्हाण, आशिष चव्हाण, गोपाल पाटील, योगेश भारद्वाज, शांताराम घुये, गोपाल जोध, गजानन ढोके, सुधाकर जाधव यांच्यासह महिला उपस्थित होत्या.



# मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपात नव्या चेहऱ्यांचा प्रवेश!

## जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांचे कार्यकर्त्यांना स्फूर्तीदायक मार्गदर्शन!

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय जनता पक्षाच्या सदस्यता महाअभियानाला बुलडाण्यात जोरदार प्रतिसाद मिळत आहे. भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांच्या नेतृत्वाखाली व मा. आमदार विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा विस्तार सुरू आहे. आज बुलडाणा येथील शिवालय जनसंपर्क कार्यालयात भाजपा पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत जिल्हाध्यक्ष डॉ. मांटे यांनी कार्यकर्त्यांना सदस्यता नोंदणीला गती देण्याचे आवाहन केले. भाजपा हा निवडणुकांपुरता मर्यादित नसून संघटन मजबूत करण्यासाठी बूथ स्तरावर काम करणारा पक्ष आहे, असे त्यांनी सांगितले. मा. आमदार विजयराज शिंदे यांनी सदस्यता अभियानाचे महत्व विशद करत कार्यकर्त्यांना अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मोहन निमरोठ, विजय भोसले, प्रभाकर जाधव, विनोद गवई यांच्यासह अनेकांनी भाजपा प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष डॉ. मांटे यांनी नवनियुक्त सदस्यांचे स्वागत केले. कार्यक्रमास भाजपा कामगार मोर्चा प्रदेश सचिव विश्राम पवार, जिल्हा सचिव सुनील देशमुख,



महिला मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष सिंधूताई खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन माजी शहराध्यक्ष अनंता शिंदे यांनी केले. भाजपाच्या सदस्यता अभियानामुळे पक्षाला स्थानिक पातळीवर अधिक बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे.

# मेहकर अपघातात एक जण गंभीर




**जनसंचलन/मेहकर**

भरधाव ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना ३० डिसेंबर रोजी सायंकाळी मेहकर कास्तकार चौकात घडली. बायपासवर लोणार तालुक्यातील खळेगाव येथील भानुदास सौंदाजी नागरे हे मेहकरकडून सुलतानपूरला दुचाकी (एमएच-२८-बीवाय-१८२४) ने घरी जात असताना पाठीमागून येणाऱ्या ट्रक (एमएच-२०-इएल-८७५९) ने धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर प्रथम मेहकर येथे व नंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये उपचार करण्यात आले. संजय नागरे यांच्या तक्रारीवरून मेहकर पोलिसांनी ४ जानेवारीला ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मेहकर आहे. पोलिस करत




# जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटनेच्यावतीने १३ वर्ष वयोगटातील मुलांची फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शालेय खेळाडूंमधील गुणवत्ता शोधण्यासाठी या जिल्हास्तरीय फुटबॉल (मुले) शालेय लिग स्पर्धा गेण्यात येत आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी १० जानेवारीपर्यंत करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व शाळांमधील खेळाडूंची या स्पर्धेत खेळण्यासाठीची आवश्यक असलेली नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाइन पद्धतीने होत आहे. दरम्यान, बुलढाणा शहरातील फुटबॉलचा दर्जा उत्तम असून येथून गुणवान खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने फुटबॉलचे दर्जेदार मैदानही बनविण्याचे प्रयत्न होत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958